पुढारी

# एम.कॉम. अभ्यासक्रम परीक्षा पुढे ढकलल्या

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ५ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या एम.कॉम. भाग-१ व २ अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.



विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या हिवाळी सत्र परीक्षांना प्रारंभ झाला आहे. एम.कॉम. भाग-१ व २ अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ५ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार होता. मात्र, सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात उद्‌भवलेल्या गंभीर पूरस्थितीमुळे पदव्युत्तर विभागाकडील प्रवेश प्रक्रिया उशिरा झाली आहे.

अद्याप अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झालेला नसल्याने काही महाविद्यालयांकडून परीक्षा पुढे ढकलण्याबाबत मागणी करण्यात आली होती. त्यामुळे एम.कॉम. भाग-१ व २ अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत. या अभ्यासक्रमाच्या परीक्षांची सुधारित तारीख लवकरच परीक्षा विभागाकडून जाहीर करण्यात येईल, असे पत्रक विद्यापीठाच्या वतीने संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविण्यात आले आहे.

# विद्यापीठातर्फे परिसर छायाचित्रण स्पर्धा

## ५० हजारांची पारितोषिके; ११ नोव्हेंबरपर्यंत मुदत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी ५० हजार रुपयांची पारितोषिके व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

या स्पर्धेत छायाचित्रकारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे. विद्यापीठ परिसरातील नव्या, जुन्या इमारती आणि स्थापत्य, जलसाठे, उद्याने, जैवविविधता या विषयांवरील छायाचित्रांचा यामध्ये समावेश असणार आहे. स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे रु. २५ हजार, रु. १५ हजार आणि रु. दहा हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धकांना दि. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत उद्यान विभाग, ॲनेक्स बिल्डिंग, पहिला मजला, मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागे, शिवाजी विद्यापीठ, येथे ही छायाचित्रे सादर करावी लागणार आहेत.

स्पर्धेत सहभागासाठी वय अथवा भौगोलिक बंधन नाही. स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. सहभागी स्पर्धकाला जास्तीत जास्त ५ छायाचित्रे सादर करता येतील. प्रत्येक छायाचित्राची ८ बाय १२ इंच आकाराची प्रत (हार्ड कॉपी) सादर करावी लागेल, तसेच त्या छायाचित्रांची हाय रिझोल्यूशन सॉफ्ट कॉपीसुद्धा सादर करणे आवश्यक आहे. स्पर्धेअंतर्गत सादर केलेले छायाचित्र ताजे, अलीकडच्या काळातले असावे. जुन्या छायाचित्रांचा विचार केला जाणार नाही.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. टी. शिर्के, टी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# सरदार पटेल, इंदिरा गांधींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर, ता. १ : माजी उपपंतप्रधान तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांना शिवाजी विद्यापीठात आदरांजली वाहिली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीत सरदार पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. भणगे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, प्रतिमापूजनानंतर विद्यापीठ परिसरात एकता रॅलीचे आयोजन केले. यामध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# विद्यापीठातर्फे परिसर छायाचित्रण स्पर्धा

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर; ५० हजारांची पारितोषिके, ११ नोव्हेंबरपर्यंत अंतिम मुदत

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठातर्फे शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी सुमारे ५० हजार रुपयांची पारितोषिके व प्रशस्तिपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. या स्पर्धेत छायाचित्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ परीक्षेत्रातील गुणी कलाकार आणि छायाचित्रकार यांच्यासाठी छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरातील नव्या, जुन्या इमारती आणि स्थापत्य, जलसाठे, उद्याने, जैवविविधता या विषयांवरील छायाचित्रे असावीत. स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार, १५ हजार आणि १० हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

सर्व सहभागी स्पर्धकांना प्रशस्तिपत्रे (सॉफ्ट कॉपी) देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठीची छायाचित्रे सादर करण्याची अंतिम मुदत ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. सदर छायाचित्रे स्पर्धकांनी उद्यान विभाग, अनेक्स बिल्डिंग, पहिला मजला, मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दाखल करावयाची आहेत.

स्पर्धेत सहभागासाठी वयाची अट अथवा भौगोलिक बंधन नाही. स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नाही. सहभागी स्पर्धकाला जास्तीत जास्त छायाचित्रे सादर करता येतील. प्रत्येक छायाचित्राची आठ बाय बारा इंच आकाराची प्रत (हार्ड कॉपी) सादर करावी लागेल. तसेच त्या छायाचित्रांची हाय रिझॉल्युशन सॉफ्ट कॉपीसुद्धा सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठाचे कर्मचारी अगर त्यांचे कुटुंबीय या स्पर्धेत भाग घेऊ शकणार नाहीत.

### स्वतंत्र गट नाही

स्पर्धेअंतर्गत सादर केलेले छायाचित्र ताजे, अलीकडच्या काळातील असावे. जुन्या छायाचित्रांचा विचार केला जाणार नाही. छायाचित्र कोठे काढलेले आहे, त्या ठिकाणाची थोडक्यात माहिती त्यासोबत द्यावी. छायाचित्रांचे संपादन, प्रोसेसिंग याविषयीची माहितीही सोबत द्यावी. कॅमेरा तसेच मोबाईलद्वारे काढलेल्या छायाचित्रांचा एकत्रितच विचार केला जाईल. त्यासाठी स्वतंत्र गट नाही. याबाबतचा अंतिम निर्णय परीक्षकांचा राहील. स्पर्धेसाठी सादर झालेल्या छायाचित्रांचे स्वामित्व हक्क शिवाजी विद्यापीठाकडे राहतील. या स्पर्धेत छायाचित्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2018

तरुण भारत

# विद्यापीठात सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना अभिवादन

**कोल्हापूर :** भारताचे माजी उपपंतप्रधान तथा लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारतीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते हा हा कार्यक्रम झाला. प्रतिमापूजनानंतर विद्यापीठ परिसरात एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. आर. पी. भणगे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 NOV 2010


तरुण भारत


# 'विद्यापीठ परिसर' छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन

## प्रथम बक्षीस २५ हजार : ११ नोव्हेंबरपर्यंत फोटो जमा करण्याची मुदत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे 'शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्रण स्पर्धे'चे केले आहे. या स्पर्धेसाठी सुमारे ५० हजार रूपयांची पारितोषिके व प्रशस्तिपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेत छायाचित्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

विद्यापीठ परिसराचे कलात्मक छायाचित्रण मोठ्या प्रमाणात उपलब्ध व्हावे, या दृष्टीने या स्पर्धेचे आयोजन



केले आहे. विद्यापीठ परिसरातील नव्या, जुन्या इमारती आणि स्थापत्य, जलसाठे, उद्याने, जैवविविधता या विषयांवरील छायाचित्रे असावीत. प्रथम विजेत्याला २५ हजार, द्वितीय विजेत्याला १५ हजार आणि तृतीय विजेत्याला १० हजार रूपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. छायाचित्रे सादर करण्याची अंतिम मुदत ११ नोव्हेंबर आहे. छायाचित्रे उद्यान विभागात द्यावीत.

**नियम व अटी**

स्पर्धेत सहभागासाठी वयाची अट नसून शुल्कही नाही. सहभागी स्पर्धकाला जास्तीत जास्त ५ छायाचित्रे सादर करता येतील. प्रत्येक छायाचित्राची ८ बाय १२ आकाराची प्रत (हार्ड कॉपी) सादर करावी लागेल, छायाचित्र काढलेल्या ठिकाणाची थोडक्यात माहिती त्यासोबत द्यावी. छायाचित्रांचे संपादन, प्रोसेसिंग या विषयीची माहितीही सोबत द्यावी.

2 NOV 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू कॉलेज सलग दुसऱ्या वर्षीही अजिंक्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापुरातील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजने इचलकरंजीतील व्यंकटेश महाविद्यालयाचा ३५–१७ अशा गुणफरकांनी पराभव करत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय महिला कबड्डी स्पर्धेचे सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद मिळविले. या अजिंक्यपदामुळे शाहू कॉलेजचा संघ शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेसाठी पात्र ठरला. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत आजरा महाविद्यालयाने (आजरा) कारवे (ता. चंदगड) येथील व्ही. के. चव्हाण महाविद्यालयाचा १ गुणांनी पराभव केला. हा सामना पुर्ण वेळेत २८–२८ असा बरोबरीत सुटल्याने आजरा व चव्हाण महाविद्यालयास सामना जिंकण्यासाठी प्रत्येकी ५–५ चढाई करण्याची अनुमती दिली होती. यात आजरा महाविद्यालयाने बाजी मारत केवळ १ गुणाने सामना जिंकला.

**शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय महिला कबड्डी स्पर्धा**

शिवाजी विद्यापीठाच्या जिम्नॅशियम हॉलमध्ये स्पर्धा झाली. स्पर्धेत कोल्हापूर विभागातील ११ महाविद्यालयांनी भाग घेतला आहे. शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. संभाजी पाटील, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक रमेश भेंडिगिरी, उमा भेंडिगिरी–भोसले, प्राचार्य आर. एन. शेवाळे, आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर बाद पद्धतीने सामने खेळविले. या सामन्यांमध्ये व्यंकटेश महाविद्यालय, आजरा महाविद्यालय, शाहू कॉलेज व चव्हाण महाविद्यालय आदी संघांनी प्रतिस्पर्धींना हरवून उपांत्य फेरीत केला होता. पहिल्या उपांत्य सामन्यात व्यंकटेश महाविद्यालयाने आजरा महाविद्यालयाला ३८–३६ गुणफरकांनी हरवून अंतिम फेरी गाठली होती. तसेच दुसऱ्या उपांत्य सामन्यात छत्रपती शाहू कॉलेजने चव्हाण महाविद्यालयावर सहज विजय मिळवून अंतिम फेरीत गाठली.



**कोल्हापूर : स्पर्धेचे अजिंक्यपद मिळविलेल्या शाहू कॉलेज संघाला मानचिन्ह देऊन गौरविताना शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक पी. टी. गायकवाड. शेजारी डॉ. रमेश भेंडिगिरी, उमा भेंडिगिरी–भोसले, डॉ. बाबासाहेब उलपे, प्रा. डी. एन. विक्रमसिंह नांगरे–पाटील, प्रा. शेखर शहा, प्रा. जी. एम. लवंगारे, प्रा. अतुल टोणे आदी.**

**विजयी खेळाडूंची नावे अशी :** मृणाली टोणपे (कर्णधार), वसुधा माने, प्रतिक्षा पिसे, स्नेहा शिंदे प्राजक्ता देसाई, प्राजक्ता पाटील, गोपिका इळके, वसुंधरा माने, अमृता सांगले, शामल पाटील, गायत्री पाटील, स्मिता शिंदे. प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी.